रयत शिक्षण संस्थेचे,

# श्री. रावसाहेब रामराव पाटील महाविद्यालय, सावळज

**ता. तासगाव, जि. सांगली.**

## अभ्यास सहल (ऐतिहासिक ठिकाण)

**दंडोबा डोंगर (देशिंग), गिरलिंग डोंगर जुना पन्हाळा (कोकटोळी), ऐतिहासिक मंदिर यल्लमादेवी (भोसे-सिद्धेवाडी)**

(दि. १४ मार्च २०२६)

- **दिनांक :** दि. १४ मार्च २०२६
- **आयोजक :** मराठी, हिंदी, इंग्रजी व मानसशास्त्र विभाग
- **सहभागी विभाग :** मराठी, हिंदी, इंग्रजी व मानसशास्त्र विभाग
- **उद्देश्य :**
  १. परिसरातील प्राचीन ठिकाणास अभ्यास सहलीच्या माध्यमातून भेट.
  २. विद्यार्थ्यांना ऐतिहासिक व पुरातन वस्तूचा प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन अभ्यास करता यावा.
  ३. विद्यार्थ्यांना ऐतिहासिक ठिकाणाचा इतिहास जाणून घेता यावा याबरोबरच मराठी भाषेतील ऐतिहासिक पुरावा शोधता यावा.
  ४. मराठीतील प्राचीन दस्तऐवजाचे जतन व्हावे.
- **सहभागी : विद्यार्थी-२५, प्राध्यापक- ०५**
- **कार्यक्रमाचा सारांश:-**

या अभ्यास सहलीत मराठी, हिंदी, इंग्रजी व मानसशास्त्र विभाग विभागातील बी. ए. भाग एक, दोन, तीन या वर्गातील विद्यार्थी सहभागी झाले होते. या सहलीत प्रथम परिसरातील प्रसिद्ध ऐतिहासिक ठिकाण दंडोबा डोंगर (देशिंग) या ठिकाणी भेट देण्यात आली. या भेटीत डोंगरावरती दंडोबा या देवस्थानचे दगडात कोरलेले प्राचीन मंदिर पाहता आले, त्या ठिकाणाचा इतिहास स्थानिक लोकांकडून जाणून घेता आला. शिवाय तेथे वास्तव्यास असलेल्या वन्य प्राण्यांच्या जाती पाहता आल्या. यानंतर सिद्धेवाडी (मिरज) येथील यल्लमादेवी मंदिरास भेट देण्यात आली. या पुरातन मंदिराची रचना पाहता आली व या मंदिराचा इतिहास ही जाणून घेता आला. तसेच गिरलिंग डोंगर (कोकटोळी) या ठिकाणी भेट देऊन तेथील जुना पन्हाळा या ऐतिहासिक गडाचे दर्शन घेण्यात आले, शिवाय तेथील गडाचे ऐतिहासिक महत्त्व ही जाणून घेता आले.

या उपक्रमाचे संयोजन मराठी विभाग प्रमुख डॉ. बाळासाहेब चव्हाण, हिंदी विभाग प्रमुख डॉ. एस. टी. कदम इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. एस. व्ही.पणदे, मानसशास्त्र विभाग प्रमुख प्रा. नवले एम. एल. यांनी केले.

**शिक्षकेत्तर सेवकांचे सहाय्य :** महाविद्यालयातील सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी

**कार्यक्रमाची निष्पत्ती:**

१. परिसरातील प्राचीन ठिकाणास अभ्यास सहलीच्या माध्यमातून भेट देण्यात आली.
२. विद्यार्थ्यांना ऐतिहासिक व पुरातन वस्तूचा अभ्यास प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन करता आला.
३. विद्यार्थ्यांना ऐतिहासिक ठिकाणाचा इतिहास जाणून घेता आला. याबरोबरच मराठी भाषेतील ऐतिहासिक पुरावा शोधता आला.

मराठी विभागप्रमुख
श्री. रावसाहेब रामराव पाटील महाविद्यालय
सावळज,जि.सांगली

PRINCIPAL
Shri.Raosaheb Ramrao Patil
Mahavidyalaya,SAVALAJ,Dist.Sang'




Scanned with OKEN Scanner


# अभ्यास सहल (ऐतिहासिक ठिकाण)

## दंडोबा डोंगर (देशिंग), गिरलिंग डोंगर जुना पन्हाळा (कोकटोळी), ऐतिहासिक मंदिर यल्लमा देवी (भोसे -सिद्धेवाडी)


## उपक्रमाचे क्षणचित्रे




ऐतिहासिक वास्तू, दंडोबा डोंगर




दंडोबा डोंगर




ऐतिहासिक यल्लामादेवी मंदिर, (सिद्धेवाडी)




गिरलिंग डोंगर (जुना पन्हाळा), कोकटोळी









Scanned with OKEN Scanner